# मिरा भाईंदर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग
## प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिका वर्धापन दिनानिमित्त "जल्लोष २०२४" सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहाने संपन्न**

दिनांक ०८ मार्च २०२४ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका वर्धापन दिनानिमित्त "जल्लोष २०२४" या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या निर्देशानुसार करण्यात आले. त्या प्रसंगी मा. आयुक्त यांनी महापालिका सर्व अधिकारी व कर्मचारी यांना वर्धापन दिनाच्या व महिलांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, उपायुक्त (मुख्यालय) मारुती गायकवाड उपायुक्त संजय शिंदे, उपायुक्त रवि पवार, उपायुक्त कल्पिता पिंपळे, शहर अभियंता दिपक खांबित, महानगरपालिका विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्वप्रथम महानगरपालिका मा. आयुक्त यांच्या शुभहस्ते कार्यक्रमाची सुरुवात दिप प्रज्वलन करून करण्यात आले. तदनंतर मा. आयुक्त यांच्या हस्ते सेवानिवृत्त शिक्षकांना ७वे वेतन आयोगानुसार पेन्शन धनादेश देण्यात आला. तसेच २८ फेब्रुवारी २०२४ रोजी आगीच्या भीषण अपघातात कार्यरत असताना जखमी अग्निशमन कर्मचारी शिवाजी सावंत यांना मा. आयुक्त यांच्या हस्ते रू. ५१,०००/- रोख, अग्निशमन दलाचे संदेश पाटील यांना रू. २१,०००/- रोख रक्कम व सन्मानचिन्ह देण्यात आले. त्याचबरोबर मिरा भाईंदर महानगरपालिका अग्निशमन विभाग अधिकारी, मुंबई, ठाणे व वसई विरार अग्निशमन दलाचे अधिकारी व कर्मचारी यांना प्रशस्तीपत्र देऊन त्यांच्या उत्कृष्ट कामासाठी सन्मान करण्यात आला. सदर सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र राज्य गीतने करण्यात आली. त्यानंतर महाराष्ट्र राज्याची संस्कृती जपणारी विविध लोकगीते, भक्तिगीत, कोळी नृत्य, कोळी गीते, लावणी, देशभक्तीपर गाण्यांवर नृत्य इत्यादी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन करण्यात आले होते. या सर्व सांस्कृतिक नृत्य, गायन कार्यक्रमात भाग घेणारे हे महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी होते. सर्व कार्यक्रम हे उत्तमरीत्या पार पडल्याने मा. आयुक्त यांनी सर्वांचे विशेष कौतुक केले. यापुढेही महापालिकेचा वर्धापन दिन असाच जल्लोषात साजरा करावा असे मत मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी व्यक्त केले.

Scanned with CamScanner